मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी चिंचवडची अंतिम प्रभाग रचना मंजूर

## महापालिकेच्या संकेतस्थळावर, मुख्यालय आणि सर्व क्षेत्रीय कार्यालयात अंतिम प्रभाग रचना पाहता येणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

महापालिका निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना सोमवारी (दि. 6) जाहीर झाली. प्रारूप प्रभाग रचनेवर घेतलेल्या 318 हरकती व सूचनांपैकी प्रभागाच्या हद्दीबाबत 22 सूचना व हरकती पूर्णतः मान्य करण्यात आले आहेत. तर 3 अंशतः मंजूर केल्या आहे. प्रभागाच्या व्याप्ती आणि वर्णनाबाबत आलेल्या तीन सूचना मंजूर करत अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देण्यात आलेली आहे.

महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने एप्रिलमध्ये दिला. त्यानंतर चार सदस्यीय प्रभाग रचनेप्रमाणे निवडणूक घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार प्रभाग रचना तयार करण्याचा आदेश राज्य निवडणूक आयोगाने महापालिकेच्या निवडणूक विभागाला दिला. त्याप्रमाणे प्रशासनाने ३२ प्रभागांतील १२८ जागांसाठी प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा तयार करून राज्य नगरविकास विभागाला सादर केला होता. नागरिकांच्या हरकती व सूचनांसाठी तो २२ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आला. त्यावर चार सप्टेंबरपर्यंत हरकती व सूचना मागवल्या होत्या. प्रभाग रचना २०१७ प्रमाणेच असल्याने अनेकांचा जीव भांड्यात पडला. मात्र, तरीही ३१८ हरकती व सूचना नोंदवल्या गेल्या आहेत. त्यावर सुनावणी होऊन नगरविकास विभागाला प्रारूप प्रभाग रचना अंतिम मान्यतेसाठी पाठवली. चार ते सहा ऑक्टोबर दरम्यान दिलेल्या अंतिम मुदतीमध्ये शेवटच्या दिवशी या अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देण्यात आलेली आहे.




प्रारूप प्रभाग रचनेवर 318 हरकती आणि सूचना घेण्यात आल्या होत्या मात्र किरकोळ स्वरूपात यावर दखल घेण्यात आली आहे. प्रभागांच्या नाव आणि व्याप्ती संदर्भात आलेल्या सूचनानुसार प्रभाग क्रमांक दहा येथील अण्णासाहेब मगर नगर, टिपू सुलतान नगर, बी.एस. एन.एल. परिसर एम.आय.डी.सी. ऑफीस चिंचवड या भागाचा समावेश प्रभाग क्रमांक १० मध्येच होता व आहे. परंतु "व्याप्ती" मध्ये त्यांचे नावाचा उल्लेख करणेत आला नव्हता.

अंतिम प्रभाग रचनेच्या व्याप्तीमध्ये नावाचा उल्लेख करणेत आला तो करणेत आला आहे.प्रभाग क्रमांक ११ भिमशक्तीनगर या भागाचा समावेश प्रभाग क्रमांक ११ मध्येच होता व आहे. परंतु "व्याप्ती" मध्ये त्यांचे नावाचा उल्लेख करणेत आला नव्हता. अंतिम प्रभाग रचनेच्या व्याप्तीमध्ये नावाचा उल्लेख करणेत आला तो करणेत आला आहे.प्रभाग क्रमांक २६.वाकड या भागाचा समावेश प्रभाग क्रमांक २६ मध्येच होता व आहे. परंतु "व्याप्ती" मध्ये त्यांचे नावाचा उल्लेख करणेत आला नव्हता. अंतिम प्रभाग रचनेच्या व्याप्तीमध्ये नावाचा उल्लेख करणेत आला तो करणेत आला आहे.

### असे आहेत बदल..

» प्रारूप प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक 1 मध्ये समाविष्ट असलेली ताम्हाणे वस्ती  आता अंतिम प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक 12 मद्ये समाविष्ट करणेत आली आहे .प्रारूप प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक 6 मधील गावजत्रा मैदान आणि मनपा हॉस्पिटल  इत्यादी भाग अंतिम प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक 7  मध्ये समाविष्ट करणेत आला आहे. प्रारूप प्रभाग रचनेत प्रभाग 24 मधील म्हातोबा वस्ती चा भाग अंतिम प्रभाग रचनेत प्रभाग 25 मध्ये समाविष्ट करणेत आला आहे. प्रभाग रचनेमध्ये अन्य कोणताही बदल नाही असे निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

### प्रारूप रचनेतील उल्लेखनीय प्रभाग आणि लोकसंख्या

सर्वाधिक लोकसंख्येचा प्रभाग क्रमांक ९ : नेहरूनगर-मासुळकर कॉलनी : ५९,३९०

सर्वांत कमी लोकसंख्येचा प्रभाग क्रमांक ५ : भोसरी-गवळीनगर-चक्रपाणी वसाहत : ४९,०४९

सर्वाधिक अनुसूचित जाती लोकसंख्येचा प्रभाग १३ : निगडी-यमुनानगर : १५,७७०

सर्वांत कमी अनुसूचित जाती लोकसंख्येचा प्रभाग १५ : आकुर्डी प्राधिकरण : ३,३९१

सर्वाधिक अनुसूचित जमाती लोकसंख्येचा प्रभाग ४ : दिघी-बोपखेल : ४,२८६

सर्वांत कमी अनुसूचित जमाती लोकसंख्येचा प्रभाग १९ : एम्पायर इस्टेट चिंचवड स्टेशन : ३८९.

# महापालिकेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना 62 कोटींचा दिवाळी बोनस

## प्रथा आणि करारानुसार 6,500 कर्मचाऱ्यांना मिळणार बोनस; 40 हजार ते 2 लाखांपर्यंतची रक्कम

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना तब्बल 62 कोटी रुपयांचे बक्षीस रक्कम मिळणार आहे. महापालिकेच्या प्रथा व परंपरेनुसार दिवाळी बोनस म्हणून तब्बल साडेसहा हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांना 8.33 टक्के सानुग्रह अनुदान व जादा 20 हजार रुपये दिले जाणार आहेत. त्यामुळे महापालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी अधिक गोड होणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघ व महापालिका आयुक्तांसोबत झालेल्या करारनामानुसार हा दिवाळी बोनस दरवर्षी दिला जातो. त्याबाबत महासंघ व महापालिकेत दर पाच वर्षांसाठी करारनामा केला जातो. मागील सन 2021 पासून हा करारनामा झाला आहे. त्यानुसार, यंदाही हा बोनस दिला जाणार आहे. महापालिकेच्या वर्ग एक ते चारमधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना बोनसचा लाभ मिळणार आहे.

अधिकारी व कर्मचाऱ्यांना 8.33 टक्के सानुग्राह अनुदान व जादा 20 हजार रूपये जादा असा बोनस दिला




जाणार आहे. बोनस देण्याची मागणी कर्मचारी महासंघाने 8 जुलैला केली होती. महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने 30 सप्टेंबरला त्या प्रस्तावाला मान्यता दिली. त्यावर आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी शुक्रवारी (दि.3) शिक्कामोर्तब केले. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळीचा धडाक्यात होणार आहे.

महापालिकेच्या सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना बोनसचा लाभ मिळणार आहे. मात्र, सहा महिन्यांपेक्षा कमी सेवा झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना बोनसचा लाभ मिळणार नाही. बालवाडी शिक्षक, मानधनावरील अधिकारी व कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी, समूह संघटक, तासिका तत्त्वावर नेमलेले कर्मचारी, महापालिका आस्थापनेवर करार पद्धतीने मानधनावर नेमलेले कर्मचारी, शासनाकडून पगारापोटी अनुदान मिळणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना बोनसचा लाभ मिळेल.

महापालिकेचे निलंबित अधिकारी व कर्मचारी, सन 2024-25 वर्षांत सेवानिवृत्त, मयत किंवा स्वेच्छानिवृत्ती घेतलेले, राजीनामा दिलेले, सेवेतून कमी केलेले, सेवा समाप्त केलेले कर्मचारी, यांचा सेवाकाल विचारात घेऊन बोनस देण्यात येणार आहे.

महापालिकेच्या सन 2024-25 च्या अर्थसंकल्पात बोनससंदर्भात रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे. ती रक्कम कमी पडत असल्यास तरतूद वर्गीकरण करावे. हा बोनस दिवाळीपूर्वी अदा करण्याबाबत कार्यवाही पूर्ण करावी, असे आदेश आयुक्तांनी लेखा विभागास दिले आहेत.

# भोसरीतील महारक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## मराठवाड्यातील पूरग्रस्त बांधवांच्या पाठीशी महाराष्ट्र शासन खंबीरपणे उभे; उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

**पिंपरी | प्रतिनिधी**

मराठवाड्यातील पूरग्रस्त बांधवांच्या पाठीशी महाराष्ट्र शासन खंबीरपणे उभे आहे. स्वतः होऊन स्वयंस्फूर्तीने पत्रकार बंधू, भगिनी देखील आता मराठवाडा मिशन उपक्रमातून मदतीस आले आहेत. आपण समाजाचे देणं लागतो या कृतज्ञ भावनेतून त्यांनी आयोजित केलेले रक्तदान शिबिर हा स्तुत्य उपक्रम आहे. यास माझ्या शुभेच्छा. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ लांडेवाडी, आणि नवमहाराष्ट्र मित्र मंडळ या सारख्या समाजातील इतर संस्था, संघटना, मंडळ, ट्रस्ट, उद्योजक व दानशूर व्यक्तींनीही पुढे यावे असे आवाहन विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केले.



मराठवाड्यात मागील दोन महिन्यात झालेल्या पाऊसामुळे तेथील शेतकरी बांधवांचे अतोनात नुकसान झाले आहे, हजारो दुभती जनावरे मृत्युमुखी पडली असून तेथील शेतकरी उध्वस्त झाला आहे. पूरग्रस्त भागात रोगराई पसरली तर रक्ताचा तुटवडा भासू शकतो यासाठी मराठवाडा मिशन अंतर्गत पहिला टप्पा म्हणून भोसरी येथे रक्तदान शिबिर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ लांडेवाडी, आणि नवमहाराष्ट्र मित्र मंडळ, भोसरी या संस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे व भोसरी विधासभेचे प्रथम आमदार विलास लांडे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक विश्वनाथ लांडे, विक्रांत लांडे पाटील, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई चे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, राज्य समन्वयक नितीन शिंदे, पुणे जिल्हा अध्यक्ष बापू जगदाळे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सचिन चपळगावकर, पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष अतुल क्षीरसागर, प्रसिद्ध चित्रकार संजय खिलारे, अभिनेत्री आर्या घारे, उद्योजक विकास साने, ब्राम्हण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.सचिन बोधणी, ॲड. गणेश शिंदे, संभाजी ब्रिग्रेडचे प्रदेश उपाध्यक्ष अभिमन्यू पवार, टी वी ९ मराठीचे प्रतिनिधी रणजीत जाधव, साम मराठी चे प्रतिनिधी गोपाळ मोटघरे, आपला आवाज नेटवर्क चे मुख्य संपादक अतुल परदेशी, एनडीटीव्ही मराठीचे प्रतिनिधी सुरज कसबे आदी उपस्थित होते. या शिबिरास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला, ४०० पेक्षा अधिक रक्तदात्यांनी सहभाग घेतला.

माजी आमदार विलास लांडे पाटील म्हणाले की, खिल्लारी भूकंपा नंतर अनेक वर्षांनंतर मराठवाड्यावर ओढवलेले हे मोठे संकट आहे. पण या संकटात पूरग्रस्त बांधवानी एकटे समजू नये, तर पिंपरी चिंचवड मधील नागरिक कायम त्यांच्या सोबत आहेत, पत्रकारांनी सामाजिक जाणिवेतून घेतलेला हा उपक्रम पूरग्रस्त भागातील बांधवांना दिलासा देणारा ठरेल असा विश्वास वाटतो.

प्रास्ताविक करताना गोविंद वाकडे यांनी सांगितले की, रक्तदान हे जीवदान आहे. आपण दिलेल्या रक्तामुळे एखाद्या व्यक्तीचा जीव वाचवू शकतो ही समर्पणाची भावना ठेऊन आयोजन केले आहे. रक्ताच्या शेवटच्या थेंबा पर्यंत आम्ही मराठवाड्यातील शेतकरी बांधवांसोबत आहोत असे गोविंद वाकडे यांनी सांगितले. सचिन चपळगावकर यांनी सांगितले की, हे संकलन केलेले रक्त गरजू रुग्णांना सोमवार पासून बार्शी येथील भगवंत ब्लड बँक आणि उमरगा, धाराशिव येथील श्री श्री रविशंकर ब्लड बँक स्टोरेज येथे उपलब्ध होईल.

# 'फोक प्रबोधन'च्या माध्यमातून लोकसंस्कृतीचा झंकार नवपिढीपर्यंत पोहोचवत मराठी भाषेला अभिवादन

## अभिजात मराठी भाषा सप्ताहात रसिकांनी अनुभवला लोककला, लोकसंगीत आणि मराठी संस्कृतीचा भावस्पर्शी संगम

**पिंपरी | प्रतिनीधी**

मराठी भाषेचे माधुर्य, लोकसंगीताची लय आणि मातीच्या गंधात रुजलेली लोकपरंपरा... या तिन्हींचा सुरेल संगम पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने सादर झालेल्या 'फोक प्रबोधन' कार्यक्रमातून रसिकांनी अनुभवला. लोककलांच्या सजीव स्वरांनी, नृत्यांच्या तालांनी आणि मराठी अस्मितेच्या ओलाव्याने भरलेला हा सोहळा केवळ कलात्मक मेजवानी नव्हे, तर मराठी संस्कृतीच्या शतकांपूर्वीच्या लोकसंस्कृतीचा ठेवा नवपिढीपर्यंत पोहोचवणारा ठरला. मराठी संस्कृतीतील शब्द, संगीत आणि नृत्य यांचा सुरेख संगम अनुभवताना रसिकांनी या कार्यक्रमाला भरभरून दाद दिली.

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा यांच्या सहकार्याने तसेच श्री भैरवनाथ सार्वजनिक ग्रंथालय, भोसरी आणि हुतात्मा चापेकर सार्वजनिक ग्रंथालय, चिंचवड यांच्या सहभागातून ३ ते ९ ऑक्टोबर २०२५ दरम्यान 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा करण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात येत असलेल्या या महोत्सवात चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात 'फोक प्रबोधन' हा कार्यक्रम सादर झाला. याप्रसंगी महापालिकेचे विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, मनोज डाळिंबकर यांच्यासह महापालिकेचे ग्रंथपाल प्रतिभा मुनावत, वर्षा जाधव, राजु मोहन, वैशाली थोरात, औद्योगिक



प्रशिक्षण संस्थेचे गट निदेशक शर्मिला काराबळे, रविंद्र ओव्हाळ, बबिता गावंडे, संगीत शिक्षक संतोष साळवे, उमेश पुरोहित आदी महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी आणि रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकसंगीत, नृत्य, भारूड, अभंग आणि पारंपरिक वाद्य यांचा रंगतदार संगम सादर करणाऱ्या 'फोक प्रबोधन' या कार्यक्रमाची सुरुवात 'पिंगळा महाद्वारी' आणि 'आला वासुदेव तुमच्या दारी' या मराठी संस्कृतीच्या सांस्कृतिक वाहकांच्या प्रतिकांच्या कलात्मक सादरीकरणातून झाली. सूत्रसंचालक शेखर नवतरे आणि दाऊद इनामदार यांच्या ओघवत्या निवेदनातून मराठी भाषेचा अभिजात दर्जा, तिचा संस्कारांचा ठेवा आणि मातीचा सुगंध अधोरेखित करण्यात आला. पारंपारिक वाद्य आणि मराठी कलेचा इतिहास यावेळी त्यांनी उलगडला. मराठी संस्कृतीतील वाद्य, गाणी ही केवळ मनोरंजनाची माध्यमे नसून त्यामध्ये भावनांचा आणि वेदनांचा अंतर्भाव आहे, असेही त्यांनी सांगितले. "ज्या भाषेला इतिहास आहे, संस्कारांची जोड आहे, मातीचा गंध आहे, ती म्हणजे आपली मराठी!" या त्यांच्या वाक्याने सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

लोककलांचा प्रवास या कार्यक्रमातून पुढे जात असताना 'गोंधळी' परंपरेचे दर्शन घडवले गेले. यामध्ये लोककलेतील पारंपरिक गोंधळ कसा आणि का घातला जातो, याचे कलाकृतीतून सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर झालेल्या गण सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले. 'जोगवा' या लोककलेच्या धाग्याने प्रेक्षकांना भारावून टाकले. या माध्यमातून कलाकारांनी त्या परंपरेतील व्यथा, वेदना आणि भावना प्रकट केली. 'पोतराज' या प्रकारात समर्पणाचे भावसंपन्न दर्शन उलगडून सांगितले.

शाहीरी परंपरेतून छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम 'जय भवानी जय शिवाजी' आणि 'चमके शिवबाची तलवार' या गजरात उजळून निघाला. त्यानंतर बासरीवादन, वारकरी भजन आणि 'ज्ञानेश्वर माऊली, जय जय विठ्ठल' च्या गजरात रंगमंचावर कलाकारांनी दिंडी सोहळा साकारला. दिव्यांग कलाकार ऋषी मोरे यांनी 'भल्या माणसा...' हे गीत सादर करत प्रेक्षकांना भावनिक साद घातली. रंगमंचावरच काही क्षणात वेशभूषा बदलत सादर करण्यात आलेल्या 'आल्या पाच गवळणी' या भारूडाला प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. त्यानंतर सादर झालेल्या धनगरी नृत्याच्या तालावर प्रेक्षक थिरकले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 'माझी मैना गावाकडे राहिली' या गाण्याचे सादरीकरण करण्यासोबतच कलाकारांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे स्मरण करीत हुतात्मांना अभिवादन केले. तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या समर्पित कलाजीवनाचा आलेख मांडणारी लावणी सादर करून रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. भैरवीने कार्यक्रमाचा मनमोहक शेवट झाला. या कार्यक्रमातून मराठी लोककला, लोकसंस्कृती आणि लोकभावना यांचा रंगतदार मेळ घडला. रसिक प्रेक्षकांनी प्रत्येक सादरीकरणाला भरभरून दाद देत 'फोक प्रबोधन'ला अविस्मरणीय बनवले.

# वाहतूक नियमनाचे व्हिसल ब्लोअर; नागरिकच बनताहेत वाहतूक नियम अंमलबजावणी अधिकारी

## पुणे पोलिसांनी पुणे वाहतूक पोलीस ॲप हे डिजिटल पाऊल उचलले हे ॲप प्रत्येक स्मार्टफोन वापरकर्त्याला प्रत्यक्ष वाहतूक निरीक्षक बनवते




**पुणे | प्रतिनिधी**

वाहनांच्या गर्दीमुळे होणारी वाहतूक कोंडी, अडवलेले फूटपाथ आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांची वाढती संख्या या समस्येने त्रस्त असलेल्या पुणे शहरात वाहतूक पोलिसांना एक अनपेक्षित मित्र मिळाला आहे. तो म्हणजे पुणे वाहतूक पोलीस हे ॲप. नागरिक, तंत्रज्ञान आणि नागरी दक्षता यांचा संगम साधणाऱ्या एका महत्त्वपूर्ण प्रयोगात, पुणे पोलिसांनी पुणे वाहतूक पोलीस ॲप हे डिजिटल पाऊल उचलले आहे. हे ॲप प्रत्येक स्मार्टफोन वापरकर्त्याला प्रत्यक्ष वाहतूक निरीक्षक बनवते. पुणे शहरातील नागरिकांनी पीटीपी ॲपद्वारे १३ जून ते ३ ऑक्टोबर या केवळ तीन महिन्यांच्या काळात तब्बल ६२,६८३ तक्रारी आणि सूचना दाखल केल्या आहेत.

१५ जून रोजी सुरू झालेले हे ॲप केवळ सरकारी योजनांमधील आणखी एक तांत्रिक उपक्रम म्हणून सुरू केलेला नाही; तर पुण्याची वाहतूक अराजकता नियंत्रित करण्याच्या पद्धतीला नव्याने आकार देणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. प्रथमच असे घडते आहे की, नागरिक सोशल मीडियावर फक्त तक्रारीचा पाढा वाचण्याऐवजी, छायाचित्रांच्या पुराव्यासह थेट नियम अंमलबजावणीवर प्रत्यक्ष परिणाम घडवत आहेत. हे पुरावे थेट ई-चलान प्रणालीद्वारे नियम तोडणाऱ्यांवर कारवाई करण्यास भाग पाडत आहेत.

पुण्याची वाहतूक समस्या अत्यंत गंभीर बनली आहे. धोकादायक पद्धतीने अरुंद जागेतून घुसणाऱ्या दुचाकीस्वारांपासून, पादचाऱ्यांसाठी असलेले फूटपाथ गिळणाऱ्या एसयूव्हीपर्यंत आणि नियमांचे सर्रास उल्लंघन करत उलट्या दिशेने चालणाऱ्या वाहनचालकांपर्यंत रोजचा प्रवास म्हणजे सहनशक्तीची परीक्षा बनली आहे.

फूटपाथ हे पार्किंग झोन बनले आहेत. बसथांबे खासगी टॅक्सी स्टँड झाले आहेत. वाहतूक सिग्नल म्हणजे केवळ एक सूचना बनली आहे. या अराजकतेत, ५० लाखांहून अधिक वाहनांच्या शहरात फक्त १२०० हून अधिक कर्मचाऱ्यांचे मर्यादित मनुष्यबळ असलेल्या अंमलबजावणी यंत्रणांना संघर्ष करावा लागत आहे. अशा वेळी ही समस्या सोडवण्यासाठी तंत्रज्ञान त्यात मोलाची भूमिका बजावत आहे.

### अपलोड झाल्यावर, डेटाची तीन टप्प्यांत पडताळणी

- इन प्रोसेस : बॅक-एंड कर्मचाऱ्यांकडून पडताळणी.
- चलान जारी : एकदा पुष्टी झाल्यावर, वाहन नोंदणीशी जोडलेले ई-चलान तयार केले जाते.
- नामंजूर : पुरावा अस्पष्ट असल्यास किंवा तक्रार दुबार असल्यास ती रद्द होते.
- प्रत्येक तक्रार उल्लंघनांच्या एका मोठ्या डिजिटल नकाशात भर घालते, ज्यामुळे अधिकाऱ्यांना वारंवार समस्या निर्माण होणारे क्षेत्र, वारंवार नियम मोडणारे लोक आणि पायाभूत सुविधांमधील त्रुटी ओळखण्यास मदत होते.
- अधिकृत आकडेवारीनुसार, एकूण ४१,२९५ उल्लंघनांवर चलन जारी करण्यात आले, त्यापैकी ८०३ प्रक्रियाधीन आहेत, तर अस्पष्ट पुराव्यामुळे किंवा तक्रार दुबार झाल्यामुळे १३,१९३ तक्रारी नामंजूर करण्यात आल्या.

### नियम उल्लंघनांचे वास्तववादी चित्र

- नियमभंग प्राप्त तक्रारी
- फुटपाथ पार्किंग १५,५२७
- उलट दिशेने वाहन चालवणे १४,९६१
- कॉर्नर पार्किंग ११,२१८
- फॅन्सी नंबर प्लेट ५,२४२
- दुहेरी पार्किंग ५,५६६
- ट्रिपल सीट ३,७४५

> १०० दिवसांच्या कालावधीत आम्ही सुमारे ४७,००० ॲप वापरकर्त्यांपर्यंत पोहोचण्यात यशस्वी झालो आहोत. सध्या आम्ही हे ॲप फक्त पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीपुरते मर्यादित ठेवले आहे. परंतु पुणे ग्रामीण आणि पिंपरी-चिंचवड आयुक्तालयातूनही तक्रारी येत आहेत. त्या आमच्या टीमद्वारे संबंधित विभागांना कळवल्या जात आहेत. हे ॲप केवळ पोलिसिंग नाही शहर नियोजनासाठीचे एक साधन ठरत आहे.
>
> **- मनोज पाटील, अतिरिक्त पोलीस आयुक्त, पुणे**

---

# पालिकेच्या नऊ हजार कंत्राटी कामगारांची दिवाळी होणार गोड...

## पहिल्यांदाच बोनस देण्याचा निर्णय, महापालिकेकडून 50 कोटींची तरतूद




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या नऊ हजाराहून अधिक कंत्राटी कामगारांची दिवाळी यंदा गोड होणार आहे. पहिल्यांदाच महापालिकेने कंत्राटी कामगारांना बोनस देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी तब्बल ५० कोटींची तरतूद केली आहे.

महापालिकेमध्ये सुमारे नऊ हजार कंत्राटी कर्मचारी नियमीतपणे काम करतात. यामध्ये प्रामुख्याने घनकचरा आणि सुरक्षा विभागातील कंत्राटी सेवकांची संख्या मोठी आहे. त्यानंतर आरोग्य, पथ, मिळकतकर विभाग, अतिक्रमण आणि आकाशचिन्ह विभागातील अन्य विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. कायद्यानुसार बोनस मिळावा, पगारी रजा मिळावा. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे आणि २ ऑक्टोबर या राष्ट्रीय सणांच्या सुट्ट्या कायद्याप्रमाणे याचा लाभ मिळावा, अशा मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होत्या. राष्ट्रीय मजदूर संघाकडून या सर्व कर्मचाऱ्यांना संघटित करून गेली ६ वर्षे वेळोवेळी विविध प्रकारची आंदोलने महापालिकेसमोर केली होती.

दिवाळी बोनस मिळावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जाते. मात्र, दरवर्षी कर्मचाऱ्यांच्या पदरी निराशा पडते. गेल्या महिन्यात झालेल्या बैठकीत आयुक्तांनी यावर्षीपासून दिवाळीपूर्वी या सर्व कामगारांना पगाराच्या८.३३ टक्के बोनस देण्याचे आश्वासन दिले होते. गेल्या अनेक वर्षांच्या मागणीला अखेर यश आले आहे.

### मान्यतेसाठी प्रस्ताव आयुक्तांकडे

- यंदा महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांना बोनस मिळाला पाहिजे, अशी भूमिका घेत बोनसचा प्रस्ताव पाठवण्याच्या सूचना कामगार कल्याण विभागाला केल्या होत्या. त्यानुसार कामगार कल्याण विभागाने सर्व विभागातील कंत्राटी कामगारांची माहिती संकलित करून याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी आयुक्तांकडे पाठवला आहे. आयुक्तांनी मान्यता दिल्यानंतर कंत्राटी कर्मचाऱ्यांना बोनस मिळणार आहे.

> "महापालिकेतील सर्व विभागातील कंत्राटी कामगारांना बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी ५० कोटींची तरतूद केली आहे."
>
> **- नवलकिशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका**

# महापालिकेची अंतिम प्रभागरचना जाहीर ; खराडी-वाघोलीत मोठा बदल

## प्रारूप प्रभाग रचनेवर मोठ्या प्रमाणावर हरकती आल्याने निवडणूक आयोगाने या हरकतींचा विचार करून काही प्रभागांमध्ये बदल केले

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी निवडणुकीसाठी पुणे महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात आली. प्रारूप प्रभाग रचनेवर मोठ्या प्रमाणावर हरकती आल्याने निवडणूक आयोगाने या हरकतींचा विचार करून काही प्रभागांमध्ये बदल केले असून प्रभागांची नावेही बदलली आहे. अंतिम प्रभाग रचनेमध्ये प्रभाग क्रमांक तीन विमाननगर-लोहगावमध्ये कोणताही बदल झाला नसल्याने जैसे थे असून प्रभाग क्रमांक चार खराडी-वाघोलीमध्ये बदल झाला आहे. थिटे वस्ती या प्रभागाला जोडल्याने प्रभाग क्रमांक चार आणखीन मोठा झाला आहे. त्यामुळे निवडणुकीत उमेदवारांची डोकेदुखी वाढणार आहे.




महापालिकेने (दि.२२) ऑगस्ट रोजी प्रारुप प्रभाग रचना जाहीर केली होती. त्यानंतर ११ व १२ सप्टेंबर रोजी यावर मागवलेल्या हरकतींवर सुनावणी पार पडली. यावेळी सुनावणीला फक्त ८२८ नागरिक उपस्थित राहिले होते. एकूण ५ हजार ९२२ हरकती आल्या होत्या. यापैकी ४ हजार ५२४ हरकती अमान्य करण्यात आल्या. १३२९ हरकती पूर्णतः मान्य झाल्या. तर ६९ हरकती या अंशतः मान्य करण्यात आल्या. प्रभाग क्रमांक तीन विमाननगर-लोहगावमधून मोठ्या प्रमाणात हरकती दाखल करण्यात आल्या होत्या.

मात्र, या प्रभागात बदल झालेला नाही तर प्रभाग क्रमांक चार खराडी-वाघोलीमधून कमी हरकती आल्या होत्या. या प्रभागात बदल झालेला असून प्रारूप प्रभाग रचनेतील प्रभाग क्रमांक पंधरा मांजरी बुद्रुक-साडेसतरानळीमधील थिटे वस्तीचा भाग अंतिम प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक चार खराडी – वाघोलीला जोडला आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक चार आणखीन मोठा झाला आहे. थिटे वस्तीचा भाग भौगोलिक दृष्ट्या तसेच नागरिकांच्या सोयीनुसार प्रभाग क्रमांक पंधराला जोडणे योग्य नसल्याने यावर हरकती आल्या होत्या. त्यानुसार बदल झाला आहे.

निवडणूक आयोगाच्या २०११ आकडेवारी नुसार प्रारूप प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक चारची लोकसंख्या ९२२८३ आहे. अनुसुचित जातीची लोकसंख्या १२८६१ तर अनुसुचित जमातीची लोकसंख्या १०३७ आहे. थिटे वस्तीचा भाग जोडला गेल्याने अंतिम प्रभाग रचनेत प्रभाग क्रमांक चारची लोकसंख्या ९७१८७ झाली आहे. अनुसुचित जातीची लोकसंख्या १३६१६ तर अनुसुचित जमातीची लोकसंख्या १०९८ झाली आहे.

महापालिकेने (दि.२२) ऑगस्ट रोजी प्रारुप प्रभाग रचना जाहीर केली होती. त्यानंतर ११ व १२ सप्टेंबर रोजी यावर मागवलेल्या हरकतींवर सुनावणी पार पडली. यावेळी सुनावणीला फक्त ८२८ नागरिक उपस्थित राहिले होते. प्रारूप प्रभाग रचनेवर मोठ्या प्रमाणावर हरकती आल्याने निवडणूक आयोगाने या हरकतींचा विचार करून काही प्रभागांमध्ये बदल केले असून प्रभागांची नावेही बदलली आहे. अंतिम प्रभाग रचनेमध्ये प्रभाग क्रमांक तीन विमाननगर-लोहगावमध्ये कोणताही बदल झाला नसल्याने जैसे थे असून प्रभाग क्रमांक चार खराडी-वाघोलीमध्ये बदल झाला आहे. थिटे वस्ती या प्रभागाला जोडल्याने प्रभाग क्रमांक चार आणखीन मोठा झाला आहे. त्यामुळे निवडणुकीत उमेदवारांची डोकेदुखी वाढणार आहे.

### हरकती जादा, मात्र, बेदखल..

» **महामार्गाच्या डाव्या बाजूला असताना वाघोली गावठाणाचा भाग प्रभाग क्रमांक चारला जोडण्यात आला आहे. गावठाण प्रभाग क्रमांक तीनमध्ये समाविष्ठ करण्याबाबत मोठ्या प्रमाणात नागरिकांनी हरकती दिल्या होत्या. मात्र, यामध्ये कोणताही बदल झालेला नसून गावठाणाचा भाग प्रभाग चारमध्ये ठेवण्यात आला आहे.**

# भीमा नदीची पाणी पातळी पूर्वपदावर; उजनी धरणातून 6600 क्युसेक विसर्ग

## उजनी धरणात 117.23 टीएमसी पाणीसाठा; शेतकऱ्यांचे बंधारे अडविण्यावर लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

उजनी धरणातून भीमा नदीपात्रात 5000 क्युसेक व पॉवर हाऊसमधून 1600 क्युसेक याप्रमाणे एकूण 6600 क्युसेकचा विसर्ग सुरू आहे. परिणामी, इंदापूर तालुक्यातून वाहणाऱ्या भीमा नदीची पाण्याची पातळी सध्या पूर्वपदावर आल्याचे चित्र रविवारी (दि. 5) पाहावयास मिळाले.



उजनी धरणातून गेल्या 8-10 दिवसांपासून भीमा नदीपात्रात मोठ्या क्षमतेने सांडव्याद्वारे पाणी सोडले जात होते. त्यामुळे नदीला पूर आलेला होता. मात्र सध्या पुणे परिसरामध्ये पाऊस थांबल्याने, उजनी धरणातून नदी पात्रात पाणी सोडण्याचे प्रमाण हे हळूहळू कमी करण्यात येऊन सध्या ते 5000 क्युसेकपर्यंत कमी करण्यात आले आहे.

उजनी धरणामध्ये रविवारी (दि. 5) पाणीसाठा 117.23 टीएमसी एवढा असून, त्यामध्ये उपयुक्त पाणीसाठा 53.57 टीएमसी एवढा आहे. सध्या धरणामध्ये 100 टक्के उपयुक्त पाणीसाठा झालेला आहे. तसेच दौंड येथून रविवारी उजनी धरणामध्ये येणाऱ्या पाण्याचा विसर्ग 8 हजार 929 क्युसेक एवढा आहे.

उजनी धरणातून भीमा नदीपात्रात 5000 क्युसेक व पॉवर हाऊसमधून 1600 क्युसेक याप्रमाणे एकूण 6600 क्युसेकचा विसर्ग सुरू आहे. जलसंपदाच्या नियमानुसार प्रत्येक वर्षी ऑक्टोबर महिन्यामध्ये भीमा नदीवरील असलेले भाटनिमगाव, टणु, शेवरे हे बंधारे ढापे टाकून पाण्याने 100 टक्के क्षमतेने अडविले जातात. सध्या उजनी धरणातून सोडण्यात येणारे पाण्याची प्रमाण कमी करण्यात आल्याने व लवकरच पाणी सोडणे पूर्ण बंद करण्यात येण्याची शक्यता असल्याने भीमा नदीवरील सर्व बंधारे पूर्ण क्षमतेने जलसंपदाकडून अडविण्याकडे आता शेतकरी वर्गाचे लक्ष लागून राहिलेले आहे.

### आता शेतकऱ्यांचे लक्ष बंधारे अडविण्याकडे!

» **जलसंपदाच्या नियमानुसार प्रत्येक वर्षी ऑक्टोबर महिन्यामध्ये भीमा नदीवरील असलेले भाटनिमगाव, टणु, शेवरे हे बंधारे ढापे टाकून पाण्याने 100 टक्के क्षमतेने अडविले जातात. सध्या उजनी धरणातून सोडण्यात येणारे पाण्याची प्रमाण कमी करण्यात आल्याने व लवकरच पाणी सोडणे पूर्ण बंद करण्यात येण्याची शक्यता असल्याने भीमा नदीवरील सर्व बंधारे पूर्ण क्षमतेने जलसंपदाकडून अडविण्याकडे आता शेतकरी वर्गाचे लक्ष लागून राहिलेले आहे, असे प्रगतशील शेतकरी शरद जगदाळे पाटील (टणू), विलासराव ताटे देशमुख (नीरा नरसिंहपूर) यांनी सांगितले.**